व्यवस्थापन मंडळ सभा, दिनांक १४ नोव्हेंबर,०२, मुवि-०२-कार्य-१९३

वरील सर्व बाबींचा, Cell च्या कार्याचा व कार्यकक्षेचा व झालेल्या ठरावांचा विचार करता व्यवस्थापन मंडळाने Students Grievance Redressal Cell नव्याने गठीत करावा म्हणून प्रस्ताव सादर.)

(व्यवस्थापन मंडळ ठरावाची प्रत २००२ च्या सहपत्र पुस्तिकेमध्ये मुवि-०२-सप-५०४ ने जोडण्यात आले आहे.)

**ठराव क्र. ए-१००/०२/२०२**

**विद्यार्थी तक्रार निवारण समिती खालील सदस्यांसह गठीत करण्यास परवानगी देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| **१.** | **संचालक, विद्यार्थी सेवा विभाग** | **अध्यक्ष** |
| **२.** | **संचालक, मूल्यमापन विभाग** | **सदस्य** |
| **३.** | **संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा** | **सदस्य** |
| **४.** | **कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती** | **सदस्य** |
| **५.** | **कुलसचिव** | **सदस्य सचिव** |

विषय क्र. ए-१००/०२/२०३

<u>सिस्टीम ॲनालिस्ट, तांत्रिक सहायक पदांकरीता निवड समितीने केलेल्या शिफारशींना व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणेबाबत</u>

(टिपणी :- सिस्टीम ॲनालिस्ट, तांत्रिक सहायक या प्रशासकीय व तांत्रिक पदांकरीता वर्तमानपत्रातून देण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांमधून पात्र उमेदवारांच्या लेखी परीक्षा ११ व १२ ऑगस्ट व मुलाखत दिनांक २२ ऑक्टोबर, २००२ रोजी घेण्यात आल्या. या संदर्भात निवड समितीने केलेल्या शिफारशींना व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव सादर.)

(समितीच्या शिफारशी बैठकीच्या वेळी सादर करण्यात येतील.)

**ठराव क्र. ए-१००/०२/२०३**

**विद्यापीठात नेमून घ्यावयाच्या सिस्टीम ॲनालिस्ट व तांत्रिक सहायक या प्रशासकीय व तांत्रिक पदांकरीता निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली.**

**(१) तांत्रिक सहायक,श्री. जी.आर.गवळी, २.श्री. पी.के.जावळे, ३. श्री. पी.के.विनकरे यांच्यातील समितीने गुणानुक्रमे श्री. जी.आर.गवळी यांची नेमणूक करण्याची शिफारस केली आहे. त्याप्रमाणे नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत.**

**(२)सिस्टीम ॲनालिस्ट या पदाकरीता निवड समितीच्या "या पदाची जाहिरात पुन्हा द्यावी " या शिफारशीप्रमाणे या पदाची पुन्हा जाहीरात द्यावी.**

**विषय क्र. ए-१००/०२/२०२**

**<u>Student Grievance Redressal Cell ची स्थापना करणेबाबत</u>**

**(टिपणी :-**दिनांक २८ सप्टेंबर, २००२ रोजी झालेल्या विद्वत परिषद सभेत "for nomination from the Academic Council : on the "Student Grievance Committee" for the School of Science and Technology" या शिर्षकाने बी-१००/०२/२० अन्वये विषय सादर करण्यात आला. या विषयावर "Resolved to recommend to the Board of Management that a centralised Students Grievance Redressal Cell be con stituted in the university असा बी-१००/०२/२० अन्वये ठराव करण्यात आला. त्यानंतर दिनांक १०.१०.०२ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत विषय क्रमांक ए-१००/०२/१६५ अन्वये दिनांक २८.०९.०२ रोजी झालेल्या विद्वत परिषद सभेचे कार्यवृत्त शिफारशींसह मान्यतेसाठी सादर करण्यात आले. सदर कार्यवृत्तास शिफारशींसह व्यवस्थापन मंडळाने ठराव क्रमांक ए-१००/०२/१६५ अन्वये मान्यता दिली.

दिनांक २४.१०.२००१ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेत विषय क्रमांक ए-१००/२००१/११२ अन्वये "Proposal regarding Students Grievance Redressal Cell" या शिर्षकाखाली प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यावर व्यवस्थापन मंडळाने ठराव क्रमांक ए-१००/२००१/११२ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारीत केला.

Students Grievance Redressal Cell यास खालीलप्रमाणे दुरूस्ती करून मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 1. | Director, Student Services Division | Chairman |
| 2. | Director, Evaluation Division | Member |
| 3. | Director, School of Commerce & Management | Member |
| 4. | Dy. Registrar (Examination Section) | Member |
| 5. | Dy. Registrar (Registration Section) | Member Secretary |
| 6. | One Member nominated by Vice-Chancellor | Member |
| 7. | One Member nominated by Board of Management | Member |

वरील ठरावातील Students Grievance Redressal Cell च्या संरचनेतील क्रं. ६ व ७ वरील नियुक्त्या अद्याप झालेल्या नाहीत म्हणून हा Cell अद्याप आस्तित्वात आलेला नाही. या Cell च्या स्थापने मागील उद्देश व या Cell ची कार्ये विचारात घेता संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांना अध्यक्ष/चेअरमन असणे उचित वाटत नाही कारण त्याच्या विभागासंदर्भात विद्यार्थ्यांकडून तक्रारी येवू शकतात. क्रं. ६ वरील नियुक्ती संदर्भात अद्यापही संबंधीत विभागाकडून मा. कुलगुरू यांचेकडे प्रस्ताव गेलेला नाही. क्रं. ७ "one nominated by Board of Management" या संदर्भात व्यवस्थापन मंडळाने द्यावयाचे member हे बाहेरील असावेत किंवा व्यवस्थापन मंडळातील सदस्यांपैकी असावेत याबाबत स्पष्टता नाही. तसेच जर हे सभासद जर व्यवस्थापन मंडळातील असतील तर त्यांनी संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य म्हणून काम करणे संयुक्तीक वाटत नाही.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

अंतर्गत संज्ञापन पत्र

**प्रेषक: सहायक कुलसचिव, नोंदणी कक्ष** **धारिका: नोंदणी / प्रोफाईल दुरुस्ती / २०१८-१९.**

**प्रति: मा. कुलगुरु** **दिनांक: २१/०९/२०१८.**

**विषय:** शिक्षणक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची प्रोफाईल अद्यावत करणे आणि सुधारित निकाल देणेबाबत.....

## उद्दिष्ट: मान्यतेस्तव

महोदय,

आपल्या विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करुन किमान एक वर्ष व त्याहून अधिक कालावधी उलटून गेल्यावर विद्यार्थ्यांकडून त्यांचा नोंदणी तपशिल (Registration Data-Profile) अद्ययावत करुन मिळण्याची आणि त्याआधारे सुधारीत गुणपत्रके व प्रमाणपत्र मिळण्याची मागणी सातत्याने होत असते. यामध्ये नाव/ पत्ता/ केंद्र/विषय बदल किंवा दुरुस्ती या बाबींचा समावेश असतो. याहून अधिक महत्वाची व बऱ्याच अंशी शंकास्पद बाब म्हणजे निकालपत्रकांवरील छायाचित्र व स्वाक्षरी बदलून सुधारित निकालपत्रके मिळण्याची मागणी केली जात आहे. अशा प्रकरणांची संख्या कमी असली तरी त्यातील धोक्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

सन-२००८-०९ पूर्वी संपूर्ण राज्यातून प्रवेश अर्ज विद्यापीठ मुख्यालयात नोंदणी कक्षाकडे जमा होत असत आणि नोंदणी कक्ष सदर अर्जाची संगणकीय नोंद (Data Entry) करीत असे: सन-२००८ नंतर हे संगणकीय नोंदणीचे काम बाहेरील एजन्सीकडे सोपविले गेले. त्यानंतर सन-२०१६-१७ पासून पूर्णपणे ऑनलाइन प्रवेश सुरु झाले.

नोंदणी तपशिल **(Registration Data–Profile)** दुरुस्त/ अद्ययावत करण्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

३.१ **नाव बदल/दुरुस्ती:** यामध्ये विद्यार्थ्यांचे स्वत:चे नाव/ वडिलांचे नाव, आडनाव आणि आईचे नाव यात शुद्धलेखनाची किंवा स्पेलिंगची दुरुस्ती करावयाची असते किंवा एक नाव बदलून वेगळे नाव नोंदवायचे असते. कधी–कधी नावाचा क्रम चुकलेला असतो. म्हणजे विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या नावाच्या ठिकाणी आईचे किंवा वडिलांचे नाव टाईप झालेले असते. अशा सर्व चुका सुधारुन विद्यार्थ्यांचे अचूक नावाची नोंद आपल्या रेकॉर्डला करावयाची असते. यासाठी विद्यार्थांचा शाळा सोडल्याचा दाखला, १०वी/१२ वीचे प्रमाणपत्र यावर नोंदविलेले नाव प्रमाण मानले जाते व त्या नुसारच आपल्या रेकॅार्डमध्ये नोंद केली जाते.

३.२ **पत्ता बदल/दुरुस्ती :** विद्यार्थ्यांच्या पत्यामध्ये चुकीचे स्पेलिंग/ अशुद्धलेखन असते, तर काही वेळा विद्यार्थी निवासबदल/ नोकरी–व्यवसाय किंवा इतर काही कारणास्तव त्याचा स्वत:चा पत्ता बदलण्याची किंवा दुरुस्त करण्याची मागणी करतो. त्यानुसार आपण बदल/दुरुस्ती करुन त्याची प्रोफाइल अद्ययावत करतो.

३.३ **विषय बदल/दुरुस्ती:** प्रवेश अर्ज भरताना चुकीचे विषय निवडले गेले असतील, किंवा विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या इच्छेने विषय बदल करुन हवा असेल तर विद्यार्थ्यांच्या रितसर अर्जानुसार विषय बदल/दुरुस्ती करण्यात येते.

मा. कुलगुरू कार्यालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्रं. : VC/8531
दि. 27/9/2018

३.४ **केंद्र बदल:** चुकीचे केंद्र निवडले गेल्यामुळे, नोकरी-धंदयामुळे, तसेच अविवाहित विद्यार्थींनींच्या बाबतीत विवाहानंतर सासरी जावे लागल्यामुळे केंद्र बदलाची/ दुरुस्तीची गरज भासते. त्यासाठी विद्यार्थ्याने विहित शुल्कासह रितसर अर्ज सादर केल्यावर केंद्र बदलून दिले जाते.

३.५ **शुल्क आकारणी :** वरील ३.१ ते ३.४ मधील बदल/ दुरुस्त्या करण्यासाठी सध्या प्रकरण निहाय प्रत्येक बाबीसाठी किंवा एकत्रितपणे रु.३००/- इतके शुल्क वि.से.विभागाकडून (नोंदणी कक्ष) आकारण्यात येते. याशिवाय नाव, विषय बदलून सुधारीत गुणपत्रके व पदवी प्रमाणपत्र पाहिजे असल्यास प्रति गुणपत्रक शंभर रुपये आणि पदवी प्रमाणपत्रास तीनशे रुपये असे शुल्क परीक्षा विभागाकडून आकारण्यात येते.

३.६ नाव/पत्ता/विषय/केंद्र यातील बदल अथवा दुरूस्ती ही नियमित बाब आहे. यामध्ये गैरप्रकाराची शक्यता जवळजवळ नसतेच.

४. **छायाचित्र व स्वाक्षरी बदल करणे:** सन-२००८-०९ ते २०१४-१५ या काळात विद्यार्थ्यांकडून मॅन्युअल फॉर्म (अर्ज) भरून घेतले जात व त्यानंतर त्यांची विभागीय केंद्रात डेटा एंट्री केली जात असे. याच कालावधीत विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये प्रचंड चुका झाल्याचे दिसून येत आहे. प्रोफाइल अपडेशनसाठी याच काळातील प्रकरणे मोठया प्रमाणावर येत आहेत. यामध्ये एका विध्यार्थाचा फोटो व स्वाक्षरी दुसऱ्याच्या अर्जावर जाणे, मुलाच्या अर्जावर मुलीचा आणि मुलीच्या अर्जावर मुलाचा फोटो स्कॅन होणे अशा चुका झालेल्या आहेत. या चुका प्रामुख्याने डेटा एंट्री ऑपरेटरकडून झालेल्या आहेत. विद्यार्थी प्रवेश अर्जासोबत टाचणीने फोटो लावून देत. अभ्यासकेंद्र ते विभागीयकेंद्र या प्रवासात फोटो गळून पडत. त्यामुळे याचा फोटो त्याला असे प्रकार डेटा एंट्री ऑपरेटरकडून झालेले आहेत. यातून विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. तसेच यातून शंका अशी उपस्थित होऊ लागली की परीक्षा नक्की कोणी दिली? प्रवेश अर्जावर/ निकालपत्रावर ज्याचा फोटो आहे त्याने की नंतर निकाल दुरुस्त करुन मागतो त्याने? त्यामुळे सध्या परीक्षा विभाग असे निकाल सुधारून देण्यास तोंडी नकार कळवित आहे.

५. यामध्ये विशेष महत्वाचा मुद्दा असा की विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्यावर एक ते दहा वर्षांनी प्रोफ़ाइल बदलाची व त्या आधारे सुधारित निकालाची मागणी करीत आहेत.सद्य:परिस्थितीत अशाप्रकारे प्रोफ़ाइल बदलण्यासाठी व सुधारीत निकाल देण्यासाठी शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर किमान किती काळानंतर अर्ज करता येईल याबाबत कुठलेही नियम, मार्गदर्शक सूचना उपलब्ध नाहीत. मात्र परीक्षा विभागाकडून असे जुने रेकॉर्ड बदलून सुधारित निकाल देण्यास तोंडी नकार देण्यात येत आहे.

मात्र अशी काही प्रकरणे प्रत्यक्ष घडली आहेत किंवा कसे याबाबत परीक्षा विभागाने आजपर्यंत कुठलीही माहिती कळविलेली नाही. याबाबत काही पाहणी/ सर्वेक्षण झाले आहे का? लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का? त्यानुसार काही चौकशी होऊन कारवाई झाली आहे का? याबाबतही परीक्षा विभागाकडून काही माहिती मिळालेली नाही. मात्र यासंदर्भातील विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारू नयेत, अशा मौखिक सूचना देण्यात येत आहे. त्यामुळे नोंदणी कक्षाकडे आलेली फोटो व स्वाक्षरी बदलाची प्रकरणे प्रलंबित आहेत.

६. विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरु असतांनाच त्याने प्रोफ़ाइल बदलाची/ दुरुस्तीची मागणी केल्यास असे बदल/दुरुस्ती करणे नैसर्गिकंन्यायाचे ठरते. त्यानुसार त्यास ठराविक शुल्क आकारून व पुरावे पाहून बदल/दुरुस्त्या करुन दिल्या जातात. मात्र आपल्याकडील शिक्षणक्रम पूर्ण होऊन मोठया कालावधीनंतर प्रोफ़ाइल बदलाची व त्या आधारे सुधारित निकालाची मागणी आल्यास नेमके काय करावे? मागणी मान्य करावयाची असल्यास त्यासाठी नेमकी काय प्रक्रिया अवलंबावी? शुल्क किती आकारावे? याबाबत स्वयंस्पष्ट नियमावली, निकष, मार्गदर्शक सूचना

तयार करणे अत्यावश्यक वाटते. आजमितीला अशी नियमावली उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची या विषयीची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

७. सदरची वस्तुस्थिती लक्षात घेऊन यावर कायमस्वरूपी उपाययोजना तयार करण्यासाठी मा. संचालक, वि.से.विभाग यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्याचे प्रस्तावित करीत आहोत.

१. संचालक, वि.से.विभाग –अध्यक्ष
२. संचालक, मानव्य विद्याशाखा- सदस्य
३. संचालक, संगणक शिक्षण विद्याशाखा
४. परीक्षा नियंत्रक – सदस्य
५. सहायक कुलसचिव, नोंदणी कक्ष – सचिव

८. या समितीने उपरोक्त मुद्यांचा विचार करून निश्चित असे निकष / नियम ठरवून देणे अपेक्षित आहे. हे नियम अंतिम मान्यतेस्तव आपणांस सादर करण्यात येतील. आपल्या मान्यतेनंतर सदर निकष/ नियम अंमलात येतील.

<u>प्रस्ताव:</u> वर नमूद केल्यानुसार आपल्या विद्यापीठाचा शिक्षणक्रम पूर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचा Registration Data – Profile बदलण्याकरिता / दुरुस्त करण्याकरिता व त्यानुसार सुधारित निकाल देण्याकरिता निकष / नियम ठरविण्यासाठी वरीलप्रमाणे समिती गठीत करून पुढील कार्यवाही करण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

21/9/18

(तु.का.सोनवणे)
सहायक कुलसचिव
नोंदणी कक्ष

मार्फत सादर:

20/9/18

१. मा.संचालक,वि.से.विभाग

२. मा. परीक्षा नियंत्रक

मा. कुलगुरु

सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२
दूरध्वनी : ०२५३-२२३१४७३, २२३१४७९ फॅक्स :२२३१७१६
- ज्ञानगंगा घरोघरी
संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac
परीक्षा विभाग

दि. 7 ऑक्टोबर 2022

# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची 43 वी परीक्षा मंडळाची बैठक शुक्रवार, दि. 7 ऑक्टोबर 2022 रोजी सकाळी 9 वाजता, व्यवस्थापन मंडळ सभागृहात ऑफलाईन / ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 01) प्रा. डॉ. पी. जी. पाटील, मा. कुलगुरू | - अध्यक्ष |
| 02) प्रा. सत्यकाम, मा. प्र-कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली | - सदस्य |
| 03) प्रा. डॉ. जयदिप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा आणि प्र. संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | - सदस्य |
| 04) श्री. माधव पळशीकर, प्र. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | - सदस्य |
| 05) प्रा. डॉ. कविता साळुंखे, प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | - सदस्य |
| 06) डॉ. प्रवीण घोडेस्वार, प्र. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | - सदस्य |
| 07) डॉ. सुनंदा मोरे, प्र. संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | - सदस्य |
| 08) डॉ. सुरेंद्र पाटोळे, प्र. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | - सदस्य |
| 09) प्रा. डॉ. माधुरी सोनवणे, प्र. संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | - सदस्य |
| 10) डॉ. राम ठाकर, सहयोगी प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | - सदस्य |
| 11) श्रीमती शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग | - सदस्य |
| 12) डॉ. वामन नाखले, विभागीय संचालक, मुंबई विभागीय केंद्र | - सदस्य |
| 13) श्री. विजयकुमार पाईकराव, विभागीय संचालक, नांदेड विभागीय केंद्र | - सदस्य |
| 14) श्री. भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक | - सदस्य सचिव |

खालील निमंत्रित सदस्य सभेसाठी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1) प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | - निमंत्रित सदस्य |
| 2) प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र. संचालक, मूल्यमापन विभाग | - निमंत्रित सदस्य |

खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

| | |
|---|---|
| 1) श्री. डी. पी. नाठे, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, नाशिक | - सदस्य |
| 2) प्रा. डॉ. संजीवनी महाले, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | - सदस्य |
| 3) डॉ. दिनेश भोंडे, नागपूर | - सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | | **वेळापत्रकात कोणताही बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्याने परीक्षेचा प्राधान्यक्रम ठरवून आवश्यक एका शिक्षणक्रमाची परीक्षा द्यावी असा निर्णय झाला. सदर निर्णय विद्यारथ्यांच्या माहितीसाठी सूचना पत्राद्वारे पोर्टलवर त्वरित प्रसिध्द करावा आणि यापुढील शैक्षणिक वर्षात सर्व शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिकेत तो ठळकपणे प्रकाशित करावे असे सर्वानुमते ठरले.** |
| | 43.4.07 | **सहकार व्यवस्थापन पदवी (P52) व सहकार व्यवस्थापन पदविका (P08) या शिक्षणक्रमाचे स्थिती अभ्यास मूल्यमापन विद्याशाखेकडे सुपूर्द करणेबाबत...**<br><br>**टिपणी :** सहकार व्यवस्थापन पदवी (P52) व सहकार व्यवस्थापन पदविका (P08) या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी MGM222 या विषयासाठी संशोधन स्वरुपात स्थिती अभ्यास सादर करावयाचा असतो. स्थिती अभ्यासाचे (Project) मुख्यालयात केंद्रीय मूल्यमापन कार्यक्रमात (CAP) बहि:स्थ तज्ज्ञ परीक्षकांकडून मूल्यमापन केले जाते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा वगळता इतर विद्याशाखेचे संबंधित विषयाचे प्रकल्प विद्याशाखा स्वत: मूल्यमापन करते व गुणदान यादी पुढील कार्यवाहीसाठी परीक्षा विभागाकडे पाठविते. स्थिती अभ्यास मूल्यमापनाचे काम हे विद्याशाखेचे असल्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षापासून अभ्यासकेंद्राकडून विद्यार्थ्यांचे स्थिती अभ्यास थेट विद्याशाखेत जमा करावेत. त्यानुसार यापुढे माहे मे २०२३ पासून स्थिती अभ्यासाचे मूल्यमापन विद्याशाखेमार्फत व्हावे असे वाटते.<br><br>सदरचा विषय मार्गदर्शन व विचारार्थ सविनय सादर.<br><br>**परीक्षा मंडळ ठराव - याबाबत बैठकीत चर्चा होऊन सहकार व्यवस्थापन पदवी (P52) व सहकार व्यवस्थापन पदविका (P08) या शिक्षणक्रमांचे स्थिती अभ्यास मूल्यमापन सद्य:स्थितीत आहे त्या पध्दतीनुसार करावेत. मात्र, यासंदर्भात समिती गठीत करून धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा असा निर्णय झाला. मा. कुलगुरूंच्या मान्यतेने, परीक्षा विभागाने समितीचे गठन करावे असे ठरले.** |
| | 43.4.08 | **डॉ. गवळी बाळू एकनाथराव यांनी पीएच.डी. नोटिफिकेशन व पीएच.डी. प्रमाणपत्रामध्ये ``समाजशास्त्र`` ऐवजी ``समाजकार्य`` करण्यासंदर्भात विचारविनियम करणे**<br><br>**टिपणी :** डॉ. गवळी बाळू एकनाथराव यांनी पीएच.डी. नोटिफिकेशन व पीएच.डी. प्रमाणपत्रामध्ये ``समाजशास्त्र`` ऐवजी ``***समाजकार्य***`` असा बदल करणेबाबत विनंतीअर्ज केला आहे. सदर विद्यार्थ्यास वर्ष 2018 मध्ये विद्या-वाचस्पती (विषय संप्रेषण - समाजशास्त्र) ह्या विषयात पदवी प्रदान करण्यात आली आहे. विद्यार्थ्याने ``औरंगाबाद शहरातील बालकामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास`` यावर आधारित विषय संप्रेषण क्षेत्रातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीच्या पूर्ततेसाठी या विषयास अनुसरून प्रबंध सादर केला आहे. त्यांचे पदव्युत्तर पदवी शिक्षण **समाजकार्य** या विषयात झालेले आहे.<br><br>सदरचा विषय परीक्षा मंडळाच्या विचार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.. (सहपत्र - J)<br><br>**परीक्षा मंडळ ठराव - यासंदर्भात बैठकीत विस्तृत चर्चा होऊन सदरचा विषय मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेत व त्यानंतर विद्वत परिषदेपुढे विचारार्थ ठेवण्यात यावा असा निर्णय परीक्षा मंडळातर्फे घेण्यात आला.** |
| | 43.4.09 | **परीक्षा गैरप्रकार प्रकरणे निवाडा समितीच्या (प्रमाद समिती) पुर्नगठणाबाबत....**<br><br>**टिपणी** - अध्यादेश क्र. 19- ए मधील एस -7 (A) नुसार परीक्षा मंडळाच्या मान्यतेने परीक्षेतील गैरप्रकारांची चौकशी करण्याकरिता परीक्षा गैरप्रकार प्रकरणे निवाडा समिती (प्रमाद समिती) गठीत करणे आवश्यक आहे. यापूर्वी दि. 02.02.2021 पासून खालील समिती सदस्यांची प्रमाद समितीवर पुढील तीन वर्षांसाठी नियुक्ती केली होती. |

<table>
<tr><td></td><td></td><td>
1. प्रा. डॉ. प्रमोद खंदारे, प्र. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा - अध्यक्ष<br>
2. प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग - सदस्य<br>
3. प्रा. डॉ. हेमंत राजगुरू, सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग - सदस्य<br>
4. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव - सदस्य<br>
5. श्री. भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक - सदस्य सचिव<br><br>
यातील प्रा. डॉ. प्रमोद खंदारे, प्र. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा हे दि. 30 सप्टेंबर 2022 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत व डॉ. हेमंत राजगुरू, सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग हे दि. 30 ऑक्टोबर 2022 रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांच्याऐवजी इतर व नवीन सदस्यांचा समावेश प्रमाद समितीवर करण्याची बाब परीक्षा मंडळाच्या विचारार्थ सादर....<br><br>
1. ______________________ - अध्यक्ष<br>
2. ______________________ - सदस्य<br>
3. प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग - सदस्य<br>
4. ______________________ - सदस्य<br>
5. ______________________ - सदस्य सचिव<br><br>
परीक्षा मंडळ ठराव - यासंदर्भात बैठकीत विस्तृत चर्चा होऊन खालीलप्रमाणे प्रमाद समिती गठीत करण्याचा निर्णय परीक्षा मंडळाने घेतला.<br><br>
1. प्रा. डॉ. जयदिप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा - अध्यक्ष<br>
2. प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र. संचालक, मूल्यमापन विभाग - सदस्य<br>
3. डॉ. चेतना कमळस्कर, सहयोगी प्राध्यापक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - सदस्य<br>
4. श्री. नागार्जुन वाडेकर, सहयोगी प्राध्यापक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा - सदस्य<br>
5. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा - सदस्य<br>
6. उपकुलसचिव, परीक्षा गैरप्रकार प्रकरणे निवाडा समिती (प्रमाद समिती) - सचिव
</td></tr>
<tr><td></td><td></td><td>मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय</td></tr>
<tr><td></td><td>43.5.01</td><td>
विद्यापीठाच्या परीक्षा आयोजनात सहभागी परीक्षा केंद्रांचे कर्मचारी आणि पेपर तपासणी करणारे Evaluators /Moderator यांचे मानधनाबाबत....<br><br>
टिपणी -विद्यापीठाच्या उन्हाळी, हिवाळी व अंन्य परीक्षा आयोजनासाठी परीक्षा केंद्रावर कार्यरत अन्य महाविद्यालयांचे कर्मचारी, तसेच विद्यापीठाच्या प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी या शिक्षणक्रमाच्या उत्तरपुस्तिका मूल्यमापन, मॉडरेशन इत्यादी प्रकारचे मानधन दर वाढविणे. तसेच विद्यापीठाच्या सर्वच शिक्षणक्रमांचे शुल्कात गेल्या 15 वर्षात वाढ करण्यात आलेली नसल्याने शुल्कवाढ करणे.<br>
सदरचा विषय आपल्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर...<br><br>
परीक्षा मंडळ ठराव - यासंदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, भविष्यात शिक्षणक्रमांच्या प्रवेश शुल्कात ज्यावेळी वाढ करण्यात येईल, त्यावेळी मानधनात वाढ करणेबाबत विचार करता येईल असा निर्णय परीक्षा मंडळातर्फे घेण्यात आला.
</td></tr>
</table>

**सदस्य-सचिव**
**परीक्षा मंडळ**

**अध्यक्ष**
**परीक्षा मंडळ**

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

## List of Lapses Committee Members - 2015

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Surya Gunjal |
| 02. | Member | Regional Director, Nashik | |
| 03. | Member | Director | Dr. Sanjeevani Mahale |
| 04. | Member | Assistant Professor | Shri Pravin Ghodeswar (Upto March 2015) |
| 05. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Arjun Ghatule |

## List of Lapses Committee Members - 2016

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Surya Gunjal |
| 02. | Member | Regional Director, Nashik | |
| 03. | Member | Director | Dr. Sanjeevani Mahale |
| 04. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Arjun Ghatule |

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
## List of Lapses Committee Members - 2017

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Surya Gunjal |
| 02. | Member | Regional Director, Nashik | |
| 03. | Member | Director | Dr. Sanjeevani Mahale |
| 04. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Arjun Ghatule |

## List of Lapses Committee Members - 2018 (Upto Feb.2018)

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Surya Gunjal |
| 02. | Member | Regional Director, Nashik | |
| 03. | Member | Director | Dr. Sanjeevani Mahale |
| 04. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Arjun Ghatule |

## List of Lapses Committee Members - March 2018 to 31.12.2018)

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Pramod Khandare |
| 02. | Member | Regional Director, Nashik | |
| 03. | Member | Assistant Professor | Dr. Hemant Rajguru |
| 04. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Arjun Ghatule (Upto 31.5.2018) |
| 05. | Member-Secretary | Controller of Examinations | Shri Jaywant Khadtale (1.6.2018 to 30.11.2018) |
| 06. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Dinesh Bhonde (1.12.2018 to 31.12.2018) |

## List of Lapses Committee Members - 2019

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Rajendra Vadnere |
| 02. | Member | Hon'ble Registrar | Dr. Dinesh Bhonde |
| 03. | Member | Director | Dr. Umesh Rajderkar |
| 04. | Member | Director | Dr. Pramod Khandare |
| 05. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Dinesh Bhonde (1.1.2019 to 19.1.2019) |
| 06. | Member-Secretary | Controller of Examinations | Dr. Arjun Ghatule (20.1.2019 to 31.12.2019) |

## List of Lapses Committee Members - 2020

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director | Dr. Rajendra Vadnere |
| 02. | Member | Hon'ble Registrar | Dr. Dinesh Bhonde |
| 03. | Member | Director | Dr. Umesh Rajderkar (Upto 31.5.2020) |
| 04. | Member | Director | Dr. Prakash Deshmukh (From 22.7.2020) |
| 04. | Member | Director | Dr. Pramod Khandare |
| 05. | Member-Secretary | Controller of Examinations | Shri Shashikant Thakare |

## List of Lapses Committee Members - 2021

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01. | Chairman | Director | Dr. Rajendra Vadnere (Upto 31.1.2021) |
| 02. | Chairman | Director | Dr. Pramod Khandare (From 2.2.2021) |
| 03. | Member | Hon'ble Registrar | Dr. Dinesh Bhonde |
| 04. | Member | Director | Dr. Prakash Deshmukh |
| 05. | Member | Associate Professor | Dr. Hemant Rajguru |
| 06. | Member-Secretary | Controller of Examinations | Shri Shashikant Thakare (Upto 1,7,2021) |
| 07. | Member-Secretary | Controller of Examinations | Shri B.P. Patil (From 2.7.2021) |

# List of Lapses Committee Members - 2022

| Sr. No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01. | Chairman | Director, School of Continuing Education | Prof. Dr. Jaydeep Nikam |
| 02. | Member | I/c Director, Evaluation Section | Prof. Dr. Sajjan Thool |
| 03. | Member | Associate Professor, School of Architecture, Science & Technology | Dr. Chetna Kamlaskar |
| 04. | Member | Associate Professor, School of Humanities & Social Sciences | Shri. Nagarjun Wadekar |
| 05. | Member | Assistant Professor, School of Education | Dr. Subhash Sonune |
| 06. | Secretary | Deputy Registrar | Dy. Registrar, Examination Section |

# List of Lapses Committee Members - 2023

| Sr.No. | Details | Capacity | Name of Member |
|---|---|---|---|
| 01 | Chairman | Director, School of Continuing Education | Prof.Dr.Jaydeep Nikam |
| 02 | Member | I/C Director, Evaluation Section | Prof. Dr.Sajjan Thool |
| 03 | Member | Associate Professor, School of Sciences | Dr.Chetna Kamlaskar |
| 04 | Member | Associate Professor, School of Humanities & Social Sciences | Shri.Nagarjun Wadekar |
| 05 | Member | Assistant Professor, School of Education | Dr.Subhash Sonune |
| 06 | Member- Secretory | Deputy Registrar | Dy. Registrar, Examination Section |

सर्वोत्कृष्ठ संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक** — **Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik**

नॅक मानांकित 'अ' श्रेणी — NAAC Accredited 'A' Grade

**अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet**

प्रेषक – भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक

विषय – प्रमाद समितीवर सचिव म्हणून सहा. कुलसचिव यांचे नामनिर्देशन करणेस मान्यता मिळणएबाबत..

धारिका – पनिका-१/२०२४/

प्रति – मा. कुलगुरू

दिनांक – २८ मार्च २०२४

---

दि. ७ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या ४३ व्या बैठकीत परीक्षेतील गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी परीक्षा अध्यादेश क्र. १९ ए मधील एस-७ (ए) अन्वये प्रमाद समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीवरील नियुक्ती दि. १ नोव्हेंबर २०२२ पासून तीन वर्षे कालावधीसाठी आहे.

1. **प्रा. डॉ. जयदिप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा — अध्यक्ष**
2. प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र. संचालक, मूल्यमापन विभाग — सदस्य
3. डॉ. चेतना कमळस्कर, सहयोगी प्राध्यापक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा — सदस्य
4. श्री. नागार्जुन वाडेकर, सहयोगी प्राध्यापक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा — सदस्य
5. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा — सदस्य
6. **उपकुलसचिव, परीक्षा गैरप्रकार प्रकरणे निवाडा समिती (प्रमाद समिती) — सचिव**

उपरोक्त समितीत नमूद केल्याप्रमाणे प्रमाद समितीचे सचिव म्हणून श्री. मनोज घंटे, उपकुलसचिव, परीक्षा कक्ष -२ यांचे नामनिर्देशन केले होते. त्यानुसार ते समितीचे कामकाज पाहत होते. मात्र, दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी श्री. मनोज घंटे, उपकुलसचिव, परीक्षा कक्ष - २ यांची विद्यार्थी सेवा विभागात बदली झालेली असल्याने व सध्या परीक्षा विभागात उपकुलसचिव पदाचे अधिकारी कार्यरत नसल्याने परीक्षा कक्ष १, २ व ३ चा कार्यभार डॉ. चंद्रकांत पवार, सहायक कुलसचिव यांचेकडे हस्तांतरित केला आहे. पर्यायाने प्रमाद समितीचे कामकाज डॉ. चंद्रकात पवार, सहायक कुलसचिव यांचेकडे सोपविणे आवश्यक वाटते.

त्यामुळे प्रमाद समितीवर डॉ. चंद्रकांत पवार यांचे सचिव म्हणून नामनिर्देशन करण्यास मान्यता मिळावी, ही विनंती.

प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर..

(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक

मान्य / अमान्य

मा. कुलगुरू

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/A583
दि. 1 / 4 /2024